गोवा सरकार

माहिती आणि प्रसिध्दी खात

पणजी-गोवा

वार्तापत्र

## जुलै महिन्याचा रेशन कोटा

ता. 19 जून 2019

29 ज्येष्ठ 1941

जुलै महिन्यात अंत्योदय अन्न योजनेच्या कार्डधारकांना 3 रूपये दराने 35 किलो तांदूळ आणि 13.50 रूपये दराने 1 किलो साखर प्रतिकार्ड देण्यात येईल, तर प्राधान्यक्रम कुटुंबांना 3 रूपये दराने प्रती माणसी 5 किलो तांदूळ देण्यात येईल. एपीएल कार्डधारकांना 12.50 रूपये दराने 8 किलो तांदूळ आणि 10 रूपये दराने 5 किलो गहू देण्यात येईल. अन्नपूर्णा कार्डधारकांना 10 किलो तांदूळ मोफत देण्यात येईल. कल्याणकारी संस्थांना कोट्याप्रमाणे 6.15 रूपये दराने आणि गहू 4.80 रूपये दराने देण्यात येईल.

स्वस्त धान्य दुकानदारांनी 30 जून 2019 पर्यंत आपला धान्य कोटा उचलून कार्डधारकांना वितरीत करावा. धान्य कोटा उचलण्यास मुदत वाढ देण्यात येणार नाही.

कार्डधारकांची रेशनवरील धान्यासंबंधी कोणतीही तक्रार असल्यास संबंधित मामलेदार कार्यालयांत किंवा नागरीपूरवठा खाते जुन्ता हाऊस पणजी येथे ती सादर करावी.

मा/वाप/एनजी/जॉआ/रना/सुसुका/2019/342